ई-मेल प्रत
दिनांक : 22/7/2022
विभाग : GAD
मु.का.अ.

जिल्हा परिषद, नांदेड.
सामान्य प्रशासन विभाग
आवक क्र.........
22 JUL 2022
खाते / शाखा
क.अ. उप.मु.का.अ अति मु.का.अ. मु.का.अ

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

सत्यमेव जयते

ग्राम विकास व पंचायत राज विभाग

**महाराष्ट्र शासन**
**ग्रामविकास विभाग**
**बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई- ४००००१**

दूरध्वनी क्र.०२२-२२०७१०३ Email Id- est14-rdd@mah.gov.in

---

क्र.न्यायाप्र-२५२२/प्र.क्र.३४२/आस्था-१४ दिनांक : २२ जुलै, २०२२.

**प्रति,**

मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद (सर्व)

**विषय** - ३० जून रोजी सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांना दि.०१ जुलै रोजीची वेतनवाढ अनुज्ञेय करण्याबाबत..

**संदर्भ** - Ministry of Personnel, Public Grievances & Pensions (Department of Personnel & Training), Government of India यांचे दि.२४/०६/२०२१ रोजीचे ज्ञापन.

**महोदय,**

१. उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, ३० जून रोजी सेवानिवृत्त झालेल्या राज्यातील अनेक जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांनी त्यांना १ जुलैची वेतनवाढ अनुज्ञेय करण्याबाबत मा. न्यायालयात विविध रिट याचिका दाखल केल्या आहेत. अशा अनेक याचिकांमध्ये ३० जून रोजी सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांना १ जुलैची वेतनवाढ अनुज्ञेय करण्याचे मा. न्यायालयाने आदेश दिलेले आहेत.

२. याच विषयाबाबतच्या (३० जून रोजी सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांना दि.०१ जुलै रोजीची वेतनवाढ अनुज्ञेय करण्याबाबतच्या) एका अन्य प्रकरणात मा.केंद्रीय प्रशासकीय न्यायाधिकरण, बेंगलोर यांच्या दि.१८/१२/२०१९ व मा.उच्च न्यायालय, कर्नाटक यांच्या दि.२२.१०.२०२० च्या आदेशाच्या अंमलबजावणीस मा.सर्वोच्च न्यायालयाने दि.०५/०४/२०२१ च्या आदेशान्वये स्थगिती दिलेली आहे. सदर वस्तुस्थिती केंद्र शासनाने संदर्भीय दि.२४/०६/२०२१ च्या ज्ञापनान्वये निदर्शनास आणून दिली आहे. सदर विषयाबाबत केंद्र शासनाने अद्याप निर्णय घेतला नसल्याने, राज्य शासनाने सध्या अस्तित्वात असलेल्या महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम, १९८१ मधील तरतूदीत सुधारणा केलेली नाही.

३. सदर विषयाच्या अनुषंगाने मा. न्यायालयात याचिका दाखल झाल्यास वरील वस्तुस्थिती मा. न्यायालयाच्या निदर्शनास आणावी. तसेच, अशा (३० जून रोजी सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांना दि.०१ जुलै रोजीची वेतनवाढ अनुज्ञेय करण्याबाबत) याचिकांमध्ये मा. न्यायालयाने पारीत केलेल्या आदेशाविरुध्द मा.सर्वोच्च न्यायालयात अपील

दाखल करावे व त्यात केंद्र शासनाचे संदर्भीय दि.२४/०६/२०२१ रोजीचे ज्ञापनातील वस्तुस्थिती मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निदर्शनास आणावी, अशी विनंती आहे.

४. सदरचे पत्र वित्त विभागाने दिलेल्या अभिप्रायानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

**आपला,**

अच्युत 22/07/2022

(अच्युत इप्पर)

**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन.**

**प्रत माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी :-**

१) विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, (सर्व).

२) उपसचिव (जि.प. आस्थापना), ग्रामविकास विभाग यांच्या अधिनस्त सर्व कार्यासने, बांधकाम भवन, मुंबई- ४००००१.

३) सरकारी वकील, मा.उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ औरंगाबाद / नागपूर.

४) निवडनस्ती.